दिनांक 23/02/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.145

विषय – नगपरिषद मालकीचे सि.स.न. 13/14 मधिल पहिला मजला गाळा नंबर 11 व 12 परत घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 20/02/2023 ने मिळकत व्यवस्थापक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

नगपरिषद मालकीचे सि.स.नं. 13/14 मधिल पहिला मजला गाळा नंबर11 व 12 श्री. लखन सच्चानंद आहुजा रा. विटा यानी जाहीर लिलावाने गाळा घेतला होता. त्यावेळी त्यांनी गाळा नं. 11 साठी कि.पा.न. 3737 दि. 19/04/2017 ने गाळा भाडे अनामत रक्कम रुपये 2,75,000/- इतकी नपा फंडात जमा केलेली आहे. तसेच गाळा नं.12 साठी कि.पा.न. एफआय 04-1680 दि. 12/09/2018 ने गाळा भाडे अनामत रक्कम रुपये 1,63,000/- व कि.पा.न. एफआय 04-1695 दि. 15/09/2018 ने गाळा भाडे अनामत रक्कम रुपये 1,62,000/- अशी एकूण रक्कम रुपये 3,25,000/- इतकी नपा फंडात जमा केलेली आहे. अशी दोन्ही गाळयांसाठी एकूण रक्कम रुपये 6,00,000/- नपा फंडात जमा केलेली आहे. परंतू त्यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे सदरचे दोन्ही गाळे परत घेणेबाबत दि. 7/12/2022 रोजीच्या लेखी अर्जाने सदरचे गाळे परत घेऊन भरलेली अनामत रक्कम परत मिळणेबाबत श्री.अहूजा यांनी विनंती केली आहे. अर्जदार श्री.आहूजा यांनी सन 2022 2023 या वित्तीय वर्षा अखेर गाळेभाडे व संकलित कराची येणे बाकी असलेली रक्कम भरली आहे. वरील दोन्ही गाळे मिळकत विभागाने ताब्यात घेतले आहेत. तरी श्री.आहुजा यांनी भरलेली अनामत रक्कम रू. 6,00,000/- परत देणेत यावी.सन 2023 2024 या वित्तीय वर्षापासून जाहीर लिलाव होईपर्यंत गाळेभाडे व संकलित कराची आकारणी थांबविणेस मान्यता देत आहे. या दोन्ही रिक्त गाळयांचा जाहीर लिलाव करणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा